**दिव्यांग कल्याण विभागांतर्गत चालविल्या जाणाऱ्या विशेष शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमाच्या पुस्तिका तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी मार्गदर्शक पुस्तिकांच्या छपाईसाठी स्वतंत्र योजना निर्माण करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**दिव्यांग कल्याण विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.२८/E Office No. 1556572/ कार्यासन-०२**
३१, ३२, ३५ ए, मित्तल टॉवर, ए-विंग, तिसरा मजला
बॅरिस्टर रजनी पटेल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१.
दिनांक :- १२ फेब्रुवारी, २०२६.

**वाचा**:-
1) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६
2) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र.इडीडी-२०१८/प्र.क्र.२८८/ अ.क.१, दिनांक १८ जुलै, २०१८
3) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन शुध्दीपत्रक क्र.इडीडी-२०१८/प्र.क्र.२८८/ अ.क.१, दिनांक ५ फेब्रुवारी, २०१९
4) सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्रमांक : शाकानि २०२२ / प्र.क्र. ६७ / १८ (र. व का.), दिनांक १५ डिसेंबर, २०२२
5) दिव्यांग कल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक : दिव्यांग २०२३ / प्र. क्र. ४६ / दि. क. १, दिनांक २४ मार्च, २०२३

**शासन निर्णय** :-

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १५ डिसेंबर, २०२२ रोजीच्या शासन अधिसूचनेन्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामधून दिव्यांग कल्याण विभाग हा स्वतंत्र मंत्रालयीन विभाग निर्माण करण्यात आलेला आहे. नव्याने निर्माण झालेल्या दिव्यांग कल्याण विभागासाठी दिनांक २४ मार्च, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेने नवीन लेखाशीर्षे निर्माण करण्यात आलेली आहेत.

2. राज्यामध्ये दिव्यांग मुलांच्या शैक्षणिक पुनर्वसनासाठी शासकीय संस्था व स्वयंसेवी संस्थांमार्फत अस्थिव्यंग, अंध, मूकबधीर व बौद्धीक अक्षम प्रवर्गासाठी शाळा, कर्मशाळा, प्रशिक्षण केंद, संलग्न वसतीगृहे, मतिमंद बालगृहे इत्यादी विशेष उपक्रम निवासी व अनिवासी स्वरुपात चालविले जातात. दिव्यांगांच्या विशेष उपक्रमांकरीता, दि.१८ जुलै, २०१८ व दि.०५ फेब्रुवारी, २०१९ अन्वये सुधारित विशेष शाळा संहिता लागू करण्यात आलेली आहे.

3. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम-१६ अनुसार शासन मान्यताप्राप्त किंवा शासन अनुदानित सर्व शैक्षणिक उपक्रमांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना सर्वसमावेशक शिक्षण देणे आवश्यक आहे. त्यासाठी संबंधित शैक्षणिक उपक्रम दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सुगम्य करून त्यांना सहाय्यक उपकरणे व इतर आवश्यक बाबी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

कलम-१७ अनुसार लक्षणीय दिव्यांगत्त्व असलेल्या विद्यार्थ्यांना दिव्यांगांसाठी सुगम्य करण्यात आलेली पुस्तके / शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

4. त्यानुसार राज्यातील विशेष शाळांमधील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमाच्या पुस्तिका, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी लाभदायी ठरतील अशा इतर पुस्तिका दिव्यांग विद्यार्थी / कर्मचारी यांना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. अशा शैक्षणिक साहित्याची वेळोवेळी छपाई करण्याची कार्यवाही करावी लागते. तरी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणिक साहित्याची छपाई करण्याच्या योजनेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

5. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०२१२१०५८४७०२३५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJESH BHASKAR GAIKWAD

Digitally signed by RAJESH BHASKAR GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PDWD, 2.5.4.20=5B1378A498CDFF3FDD9EA5370B71FAE3ECA97E85924D0E443758ADE5F0221F9A, postalCode=400021, st=Maharashtra, serialNumber=26E171EC96C63F6333217D12FB6DA1C5A800CE18A7A6FD59ABF19B8ED3F02A91, cn=RAJESH BHASKAR GAIKWAD
Date: 2026.02.12 10:59:52 +05'30'

**( रा. भा. गायकवाड )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा. सर्व मंत्री / राज्यमंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५) मा. विरोधी पक्षनेता ( विधानसभा / विधान परिषद), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
७) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई,
८) प्रधान महालेखापाल (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई,
९) प्रधान महालेखापाल (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपुर,
१०) मा.मंत्री (दिव्यांग कल्याण), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
११) सचिव, दिव्यांग कल्याण विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०० ०२१,
१२) आयुक्त, दिव्यांग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१३) जिल्हाधिकारी, मुंबई शहर / मुंबई उपनगर
१४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद-सर्व,
१५) उपसचिव (अर्थसंकल्प कक्ष), दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६) दिव्यांग कल्याण विभागाच्या नियंत्रणाखालील जिल्हा स्तरावरील सर्व अधिकारी,
१७) निवडनस्ती ( कार्यासन-०२).